**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**सुधारीत प्रेस नोट**

- **माघी श्रीगणेश विसर्जनाकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्फत ११ कृत्रिम तलावांची व्यवस्था**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माघी श्रीगणेश विसर्जना करीता महानगरपालिका मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात एकूण ११ ठिकाणी कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.

माघी श्रीगणेश विसर्जन दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व POP (Plaster of paris) मुर्त्या कृत्रिम तलावामध्ये विसर्जन करण्यात येणार आहे. यासाठी शहरात एकूण ११ ठिकाणी महानगरपालिकेच्या मार्फत कुत्रीम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे ०६ फुटापेक्षा उंच श्रीगणेश मूर्तिच्या विसर्जनाकरीता भाईंदर (पश्चिम) जेट्टी व भाईंदर (पूर्व), जेसल पार्क चौपाटी या ०२ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून हायड्रोलिक क्रेनची देखील व्यवस्था महानगरपालिकेच्या मार्फत करण्यात आली आहे.

माघी श्रीगणेश विसर्जन करिता महानगरपालिका मार्फत कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात येणार आहे. याप्रमाणे १) उत्तन समुद्रकिनारा, २) सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर पश्चिम, ३) मूर्धा गावदेवी तलाव भाईंदर पश्चिम, ४) भाईंदर पश्चिम जेट्टी, ५) जेसल पार्क चौपाटी भाईंदर पूर्व, ६) स्व.आनंद दिघे मैदान- भाईंदर पूर्व, ७) गोडदेव स्व. इंदिरा गांधी तलाव भाईंदर पूर्व, ८) शिवार गार्डन, मिरारोड पूर्व, ९) घोडबंदर स्मशानभूमी उघाडी, १०) साई दत्त तलाव पेणकर पाडा, ११) जरीमरी तलाव काशिमिरा, याठिकाणी प्रत्येकी एक कृत्रिम तलावासह, पाच पोहणारे कर्मचारी तैनात असणार आहे. सर्व नागरिकांनी सुसज्ज कृत्रिम तलावाचा वापर करावा, पर्यावरणपूरक उत्सव साजरा करून, प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिका मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.